Fax No. Jan. 19 2010 02:45PM P1

Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education, Pune
S.No. 832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Bhamburda, Shivajinagar, Pune 411 004

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.नं. ८३२-ए, फा.प्लॉ.नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आगरकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Telephone No. EPABX - [illegible], Chairman (P) - 25651751, Secretary (P) - 25651750

क्रमांक.रा.मं/परीक्षा -५/ ३३३
पुणे - ४११ ००४
दिनांक - १३/१/२०१०

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषय :- ऑटीझमग्रस्त असलेल्या इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांना विशेष सवलती देण्याबाबत...

संदर्भ :- शासनाचे पत्र क्रमांक/एसएससी-२५०९/(२०८/०९) उमाशि-२, दि.२ जानेवारी, २०१० चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, इयत्ता ९ वी व १० वीमध्ये शिकत असलेल्या ऑटीझमग्रस्त विद्यार्थ्यांना मंडळनियमावली विनियम १९७७ मधील पृष्ठ क्र. २११ वरील सवलतीमध्ये नव्याने अंतर्भुत करावयाच्या खालील अनुक्रमांक १ ते ९ सवलतीस शासन मान्यता प्राप्त झाली आहे.

ऑटीझमग्रस्त विद्यार्थी ज्या शाळेचा विद्यार्थी असेल त्या शाळेतच परीक्षा केन्द्र असल्यास सदर विद्यार्थ्यांची प्राधान्याने त्याच केन्द्रावर बैठक व्यवस्था करण्यात यावी अन्यथा मागणीनुसार जवळचे सोयीचे केन्द्र देण्यात यावे. विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही असे पहावे.
या विद्यार्थ्यांना प्रत्येक तासाला २० मिनिटे, २ तासांच्या प्रश्नपत्रिकेसाठी ४० मिनिटे, अडीच तासांच्या प्रश्नपत्रिकेसाठी ५० मिनिटे आणि तीन तासांच्या प्रश्नपत्रिकेसाठी ६० मिनिटे जादा वेळ देण्यात यावा.
कारक कौशल्यांचा विकास न झालेल्या ऑटिस्टिक विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर वापरावयाची परवानगी देण्यात यावी. फक्त या कॉम्प्युटरवर पूर्वीची कोणतीही माहिती (Previous data) असता कामा नये. ही काळजी संबंधित प्राचार्यांनी/केंद्रप्रमुखाने घ्यावयाची आहे.

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education, Pune

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे

Telephone No. EPABX 25705000, Chairman (P)-25651751, Secretary (P)-25651750



या विद्यार्थ्यांना कॅलक्युलेटर वापरण्याची परवानगी आहे. फक्त Calculator स्वरूपात असावा

४) मोबाईलमधील कॅलक्युलेटर वापरता येणार नाही.

५) प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळी या विद्यार्थ्यांना स्पर्श आणि दृश्य स्वरूपात ज्या समस्या असतात त्यामुळे त्यांना प्रात्यक्षिक परीक्षा देण्यात अडचणी येतात. त्यासाठी त्यांना अंध विद्यार्थ्यांप्रमाणे मौखिक स्वरूपात उत्तरे देण्याची परवानगी देण्यात यावी.

६) हे विद्यार्थी अनुत्तीर्ण होत असतील तर प्रचलित पद्धतीनुसार अपंग विद्यार्थ्यांप्रमाणेच जास्तीत जास्त २० अनुग्रह गुण म्हणून या विद्यार्थ्यांना देण्यात यावेत.

७) ऑटीझम या अपंगत्वासाठी आवश्यक असलेले वैद्यकीय प्रमाणपत्र मुंबई येथील नायर हॉस्पिटल, सायन हॉस्पिटल, पुणे येथील ससून हॉस्पिटल, शक्य नसल्यास जिल्हा शल्य चिकित्सालयाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

८) सदर विद्यार्थ्यांना अंध विद्यार्थ्यांप्रमाणेच भाषा विषय योजना देण्यास परवानगी देण्यात यावी. फक्त गणित या विषयात अंकगणिताबरोबर सामान्य गणित हाही पर्याय ठेवण्यात यावा.

९) विद्यार्थ्यास आवश्यक असलेल्या सवलती मिळण्याबाबतचा उल्लेख त्यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्रात असणे आवश्यक राहील.

तरी उपरोक्त सवलती ऑटीझमग्रस्त विद्यार्थ्यांना मार्च २०१० च्या परीक्षेपासून देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

प्रत माहितीसाठी-

१) अध्यक्ष, फोरम फॉर ऑटीझम, मुंबई
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ पुणे-४
३) मुल्यमापन अधिकारी, संशोधन, पापुअ, पापुई शाखा, राज्यमंडळ

To,
The Divisional Secretary,
Maharashtra State Board of Secondary
and Higher Secondary Education,
All Divisional Boards.

Sub : Granting of special concessions to autistic students of Std. 9th and 10th

Ref : Government's letter no. ...... dtd. January 2, 2010.

With reference to the above mentioned letter we would like to inform you that the following concessions no. 1 to 9 to be granted to autistic students studying in the 9th and 10th Std., are to be included in the Boards Regulations 1977, on page 211 and the Government has given its nod for the same.

1. If the autistic child's school itself is a centre for the Board Exams the same be granted to the child on a priority basis and if not so, a convenient centre be given as per the demand. Care should be taken that the child faces no inconvenience.

2. This student be given 20 minutes extra per hour, ie 40 minutes for a 2 hrs question paper, 50 minutes extra for a two & half hour paper and 60 minutes extra for a 3 hour paper.

3. Autistic children who lack in (writing) skills should be provided with computers. But care should be taken that there is no previous data on the computer. This care should be taken by the Principal or Centre head.

4. These children will be allowed to use calculators. But the calculator should be in mere calculator form. Use of calculators in mobiles will not be allowed.

5. Due to problems with regard to touch and sight these children face difficulties during practical exams, so they be granted the permission to give oral answers as in the case of blind students.

6. In case any of these children are failing, a maximum of 20 grace marks be given as is the practice in the case of disabled students.

7. Medical Certificates for the disability of Autism be collected from Nair Hospital and Sion Hospital in Mumbai and Sasoon Hospital in Pune. If that is not possible, a certificate from the District Hospital is mandatory.

8. These students be allowed to select language subjects as in case of the blind students. Only in case of Maths, along with Arithmetic there should be the option of General Maths as well.

9. The Medical Certificate should make a clear mention of the concessions required by that particular student.

Pl do the needful to make these concessions available to the autistic students from the March 2010 examinations..

Secretary,
State Board, Pune.